# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## दैनंदिन प्रेस नोट दि.२३/०१/२०१८
## दि.२२/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ९४/१८,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | ओंकार गांधी,वय २९ वर्षे,रा.काळेपडळ, हडपसर,पुणे |
| **आरोपी** | तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०१/२०१८ रोजी रात्रौ २०/०० वा.चे सुमारास ग्लायडींग सेंटरच्या बाजुस समृध्दी हॉटेलजवळ, हडपसर, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे पायी घरी जात असताना, समृध्दी हॉटेल जवळ आले असता, यातील तीन अनोळखी इसमानी फिर्यादीस डोक्यात दगड मारून जखमी करून, फिर्यादी यांचे खिशातील रोख रक्कम, एक मोबाईल, व एक घडयाळ असा एकुण २१ हजार १००/- रु.किमतीचा ऐजव जबरदस्तीने चोरुन नेला आहे. (यातील फिर्यादी हे जखमी असल्याने हॉस्पिटलमध्ये उपचार घेवुन आल्यानंतर तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. अदलिंग ९५२७०४०१०१ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे २५/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | अशिष इंगळे,वय २४ वर्षे,खराडी बायपास,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/०१/२०१८ रोजी रात्रौ ०१/३० वा.चे सुमारास कान्हुर पठार पतसंस्था शाखा चंदननगर समोर,पुणे-नगर रोडचे ,उत्तरबाजुस फुटपाथ लगतरोडवर पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचा मित्र नामे-संघानंद संतोष चौरे,असे पिझ्झा हट फिनिक्स मॉल विमाननगर,पुणे येथे कामास असुन,ते पायी घरी जात असताना,वर नमुद ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद चार अनोळखी इसमांनी, मोटार सायकलवरुन त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांना चाकुचा धाक दाखवुन, त्यांचे खिशातील एक मोबाईल व रोख रक्कम २ हजार २०/- रुपये व मित्र नामे-संघानंद चौरे, यांचे जवळी रोख रक्कम ५००/- रुपये असा एकुण १४ हजार ५२०/- रुपये किंमतीचा माल जबरदस्तीने चोरुन घेवुन, मोटार सायकलवरुन पळुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.आर.खोकले ९८५०९०९५५५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २३/१८,भादविक ३२६(अ) |
| **फिर्यादी** | भुषण साबळे,वय २० वर्षे,रा.सिंहगडरोड,पुणे |
| **आरोपी** | मनोज चव्हाण, वय ४२ वर्षे,रा.स्टार मित्र मंडळा जवळ,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०१/२०१८ रोजी १२/१५ वा.चे सुमारास आण्णाभाऊ साठे पुतळा,सारसबाग,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादीचे वडील नामे-भारत साबळे, व यातील नमुद इसम मनोज चव्हाण हे ऐकमेकांचे ओळखीचे असुन, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, फिर्यादीचे वडील रस्ताने पायी जात असताना, मनोज चव्हाण याने काहीएक कारण नसताना, फिर्यादी यांचे वडीलांच्या चेह-यावर व छातीवर ॲसिड टाकुण गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. चाऊस ८८८८९७ ४३४३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५५/१८,भादविक १४३,१४४,१४७,१४९,४५२,३३६,५०४,५०६(१),(२),५०९ |
| **फिर्यादी** | मच्छींद्र वडमारे,वय ३७ वर्षे,रा.रामवाडी,पुणे |
| **आरोपी** | १)सोन्या उत्तम अवधुत, २)रोहित उत्तम अवधुत,वय २७ वर्षे, ३)सुयश नाथा वाघमागे,वय २५ वर्षे ४)अक्षय अल्बर्ट ठोकळ, ५)प्रशआंत शिराळ, ६)मोहम्मद उर्फ कुल्ल्या सुभान शेख,वय २८ वर्षे, ७)शुभम रवि औरसमल,वय १९ वर्षे, व त्यांचे इतर साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०१/२०१८ रोजी रात्रौ ०२/०० वा.चे सुमारास सर्व्हे नं.२०४/२०५ सिद्धार्थनगर नगर रोड रामवाडी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी दि.१८/०१/२०१८ रोजी यातील नमुद इसमांचे विरुद्ध पोलीसांकडे केले तक्रारीचा राग मनात धरुन, वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद इसमांनी संगणमत करुन, हातात लाकडी दांडके,तलवारी घेवुन येवुन, बेकायदेशीरपणे फिर्यादी यांचे घरात घुसुन,फिर्यादी यांना शिवीगाळ व मारहाण करुन, फिर्यादी यांचे पत्नीस अश्लील शिवीगाळ करुन, फिर्यादी यांचा भाऊ रवि यास जिवे ठार मारण्याची धमकी देवुन पोलीसांकडे पुन्हा तक्रार केल्यास वस्तीत राहु देणार नाही अशी धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जी जी मोरे ९५२७००३२२८ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ५६/१८,भादविक ४२०,४०६,४६५,४६८,४७१,३४ |
| **फिर्यादी** | नितीन गागरे,वय ३३ वर्षे,रा.फुरसुंगी,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | १) सोर्सींग एक्झीकेटीव्ह अमोल पिलानी २)रेणुका कुलकर्णी ३)फीनो कॅशिअर रामदास चितळकर ४)सोर्सींग टीम असिसिटंट मॅनेजर कुशांक उपाध्याय ५)ऑन रोडिंग एक्झीकेटिव्ह ब्रीजेश वाघवाले (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे २०१७ ते दि.२०/०१/२०१८ रोजी पर्यंत ओला कंपनी सृष्टी सेंटर रामवाडी पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले कालाधवीमध्ये यातील नमुद इसम व महिला यांनी आपसात संगणमत करुन कस्टमरला ओला कंपनीची गाडी चलविण्यासाठी देवुन त्याचेकडुन पैसे घेवुन त्यांना बनावट पावती देवुन सदरचे पैसे ओला कंपनीमध्ये न भरता ते स्वतःचे आर्थीक फायदयाकरिता वापरुन, कंपनीचे एकुण २५ लाख रुपयाचा अपहार रुपयांचा अपहार करुन ओला कंपनीचे फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सहा.पो.निरी. जी जी मोरे ९५२७००३२२८ |

## <u>दि.२३/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४३/१८,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | ज्ञानेश्वर उर्फ रणजीत गोसावी, वय २८ वर्षेरा.संतोषनगर, कात्रज,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल धारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०७/२०१७ रोजी ते दि.०८/१०/२०१७ रोजीचे दरम्यान कात्रज, भाजी मंडई व भारती विद्यापीठ मेनगेट समोरील मनी ट्रान्सफर केंद्र,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारकांनी मसाज करायचे काम मिळवुन देतो असे सांगुन फिर्यादी यांना वेळोवेळी एकुण ४४ हजार रुपये बँक खात्यामध्ये भरण्यास लावुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. जे.डी.पायगुडे सायबर गुन्हे शाखा,पुणे शहर |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**